# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिने प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

---

**क्रमांकः मप्रनि / सह-सं. (हप्रनि.)/** ४३९०

**दिनांकः-** १५ **/१०/२०१५**

**प्रति,**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे /नवी मुंबई / कल्याण

**विषयः-** दिनांक ३०/०९/२०१५ रोजी मा. सदस्य सचिव ,म.प्र.नि. मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या तारापूर, नवी मुंबई / डोंबिवली अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीसाठी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत ..

उपरोक्त विषयाबाबतचे इतिवृत्त मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ यांनी मान्य केले आहे. तरी याबाबत आपल्या कार्यालयाशी संबधीत विभागांना / कारखान्यांना पत्राव्दारे कळविण्यात यावे व त्यासंबंधीचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. (सोबत इतिवृत्ताची छायांकित प्रत जोडली आहे.)

**सोबतः- वरीलप्रमाणे.**

**(वि. मो. मोटघरे)** १५/x/१५
सह-संचालक (हप्रनि)

**मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई सीपीआयए ॲक्शन प्लान बाबतची दि.३०.०९.२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत**

\- - - - - -

सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०.०९.३०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन, मुंबई येथे टीटीसी इंडस्ट्रिअल, क्लस्टर नवी मुंबई पर्यावरण कृती आराखडा अंमलबजावणीसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली. उपस्थित असलेले अधिकारी व उद्योगाचे प्रतिनिधी, तसेच संबंधित शासकीय प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम सह संचालक (हप्रनि), म.प्र.न.मंडळ यांनी सदस्य सचिव, तसेच उपस्थित सर्व प्रतिनिधी यांचे स्वागत करुन प्रस्ताविक केले. त्यानंतर सदस्य सचिव यांनी नवी मुंबई शहर व त्या लगतची टीटीसी औद्योगिक वसाहत याचा एकंदरीत विचार करता, सद्य:स्थितीत सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, सामायिक घातक कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र, महानगरपालिकेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र याबाबत थोडक्यात माहिती दिली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रसिध्द केलेले गुणांकन कमी करण्याकरीता सर्व सहभागीदार यांनी नियोजित व कालबध्द कार्यक्रम राबविणे आवश्यक झालेले आहे. त्या अनुषंगाने, विभागनिहाय जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून केलेल्या कामाचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. सह संचालक (हप्रनि), म.प्र.नि.मंडळ यांनी नवी मुंबई क्लस्टरच्या पर्यावरण विषयक कृती आराखडयासंदर्भात सादरीकरण केले.

सादरीकरणादरम्यान झालेली मुद्देनिहाय चर्चा खालीलप्रमाणे आहे.

**मुद्दा क्र. १ :-**

अ. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमार्फत औद्योगिक वसाहतीचे क्षेत्र तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या रहिवाशी क्षेत्रात पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याचा लेखाजोखा तयार करुन औद्योगिक व घरगुती वापर असे वर्गीकरण करावे व सीईटीपीस पाठविण्यात येणारे सांडपाणी आणि सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत प्रक्रिया करण्याकरीता पाठविण्यात येणारे सांडपाणी

याबाबतचा सविस्तर तपशिल १५ दिवसांच्या आंत सादर करावा. तसेच कोणत्याही परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी जलस्त्रोतात विनाप्रक्रिया मिसळणार नाही याची पूर्णपणे काळजी घ्यावी.

ब. औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी वाहतूक करणाऱ्या जलवाहिन्यांमधुन होणाऱ्या गळतीस त्वरित प्रतिबंध करण्याकरीता म.औ.वि.महामंडळाने प्रस्तावित केलेला कार्यक्रम समाधानकारक व वेळेत पूर्ण करण्याकरीता SCADA सारखे उपलब्ध तत्रज्ञानाचा वापर करुन गळती रोखण्यात यावी.

**मुद्दा क्र.२ :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व उद्योगांचे प्रतिनिधी यांनी जागा उपलब्धतेचे कारण पुढे करुन झाडे लावण्याबाबतची अडचण सांगितली. त्यावर सदस्य सचिव यांनी सदर कारण ग्राहय धरण्यासारखे नाही व याकरीता म.औ.वि.महामंडळाने भुखंडनिहाय मोकळया जागेच्या उपलब्धतेबाबतचा आढावा घ्यावा व हरित पट्टा निर्मितीसाठी उपलब्ध जागेबाबतचा अहवाल १५ दिवसांत सादर करावा.

**मुद्दा क्र.३ :-**

अ. सर्व वाहनांना पुरेसा सीएनजीचा पुरवठा होण्याच्यादृष्टीकोनातून मे.महानगर गॅस लि. यांनी म.औ.वि.महामंडळ परिसरात नविन स्टेशन उभारण्याकरीता लागणाऱ्या भुखंडाबाबतचा प्रस्ताव ७ दिवसांत म.औ.वि.महामंडळाकडे सादर करावा व त्यावर म.औ.वि.महामंडळाने सत्वर निर्णय घ्यावा.

ब. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी नवी मुंबई परिसरात वापरात असलेली वाहने बहुतांशी सीएनजीवर चालत असल्याचे सांगितले. त्यावर मा.सदस्य सचिव यांनी याबाबत सांख्यिकी अहवाल, जसे – एकूण नोंदणी झालेले ऑटो रिक्षा, कार, टेम्पो, ट्रक, बस, इ. त्यापैकी सीएनजीवर चालणारे वाहने आणि १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुनची वाहने, तसेच पीयुसीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची संख्या, इ. बाबत १५ दिवसात सादर करण्यास सांगितले.

**मुद्दा क्र.४ :-**

नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे ७० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले. त्यावर सदस्य सचिव यांनी रस्ते हा घटक हवा प्रदूषणाशी निगडीत

असून रस्त्याची दूर्दश: ही धुलिकन वाढण्यासाठी कारणीभूत आहे, त्यामुळे रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यास सांगितले.

**मुद्दा क्र.५ :-**

नवी मुंबई महानगरपालिका, म.औ.वि.महामंडळ यांनी टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे काम पूर्ण झालेल्या ठिकाणी मोकळया जागेत त्वरित वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घ्यावा. तसेच प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी हवेची गुणवत्ता मोजमाप करणाऱ्या केंद्रांच्या परिसराची पाहणी करुन ७ दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले.

**मुद्दा क्र.६ :-**

सह संचलाक (हप्रनि) यांनी टीटीसी औद्योगिक वसाहतीलगत वसलेल्या १०१ स्टोन क्रशर व त्यापासुन उद्‌भवणारे वायु प्रदूषण व त्यावरील उपाय याबाबत नमुद केले. दगड खाण व खडी क्रशर मशिन असोसिएशन यांनी मागील बैठकीच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक कार्यवाही न झाल्याबाबत चिंता व्यक्त केली. तसेच प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणात जवळपास ७५ खडी क्रशर मशिन हे म.प्र.नि.मंडळाच्या संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन करीत नसल्याचे सांगितले. त्यावर दगड खाण व खडीक्रशर मशिन असोसिएशन यांचे प्रतिनिधी यांनी वस्तु:स्थिती मान्य करत यास जबाबदार सर्व यंत्रणांनी काळजी घेण्यास सांगितले. तसेच नजिकच्या काळात म्हणजेच २०१६ मध्ये सिडकोचे लीज संपत आहे. पर्यावरण पुरक कामे करण्याची दगड खाण मालक, तसेच खडी क्रशर मशिन धारक यांची मानसिकता दिसून येत नाही. भविष्यात या दगडखाण, तसेच खडी क्रशर मशिन यांच्या परवान्यांचे नुतनीकरण करतांना सर्व बाबींची पुर्तता करणाऱ्या उद्योगांचा विचार करावा. मा.सदस्य सचिव यांनी प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांना याबाबत खडी क्रशर मशिनच्या पाहणी अहवालाचे वर्गीकरण (COMPLETE, PARTIAL, NONE) करुन काही खडी क्रशर मशिनवर कडक कारवाई करण्याचे निर्देशित केले. तसेच दगडखाण परवान्याबाबत सिडको प्रशासन, जिल्हाधिकारी यांना लेखी कळविण्याबाबत सांगितले.

**मुद्दा क्र.७ :-**

सह संचालक (ह.प्र.नि.) यांनी सेपीचा गुणांक हा मानवाच्या आरोग्याचा घटक ग्राहय धरुन करण्यात आल्याचे सांगितले. त्यावर उद्योगांमध्ये कार्यरत कामगारांचे आरोग्याबाबतचा

अहवाल औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय यांनी देणे क्रमप्राप्त आहे. औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय यांच्या प्रतिनिधींनी उद्योगांमध्ये कामगारांच्या आरोग्याची तपासणी प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत केली जात असल्याचे सांगितले. सदस्य सचिव यांनी उद्योगनिहाय कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय यांना १५ दिवसांत सादर करण्यास सांगितले.

**मुद्दा क्र.८ :-**

टीटीसी औद्योगिक परिसरात मुख्य:त्वे हवा प्रदूषण सयंत्रणा सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच या परिसरात गॅसची उपलब्धता आहे. त्यामुळे सर्व उद्योगांनी गॅस या पर्यावरण पुरक इंधनाचा वापर करावा. कोळशावर आधारित उद्योगांनी त्वरित गॅसवर आधारित बाष्पके चालवावी. महानगर गॅस यांचे प्रतिनिधी सद्य:स्थितीत एकूण ६० उद्योगांना पीएनजी या इंधनाची जोडणी व पुरवठा होत असल्याचे सांगितले. तसेच प्राप्त ३९ उद्योगांचा गॅस जोडणीचा प्रस्ताव विचाराधिन असल्याचे सांगितले. सदस्य सचिव यांनी प्रथम मोठे उद्योग यांना गॅस वापराबाबतची शर्थ अनिवार्य करण्याचे निर्देश दिले. तसेच याबाबत प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी मोठया उद्योगांचा आढावा घ्यावा.

**मुद्दा क्र. ९ :-**

टीटीसी परिसरातील स्थित उद्योगांनी हवा व जल प्रदूषण निवारणाकरीता उभारलेल्या सयंत्रणेबाबत, ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशन, संबंधित उद्योग व प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी संयुक्तपणे आढावा घ्यावा व आवश्यक त्या ठिकाणी अद्यावतीकरणाचे काम हाती घ्यावे.

**मुद्दा क्र.१० :-**

टीटीसी परिसरात ऑनलाईन मॉनिटरिंग यंत्रणा बसविण्यासाठी निर्देशित केलेल्या सर्व उद्योगांनी त्याची पुर्तता करावी व याबाबत प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी आढावा घेऊन ७ दिवसांत यंत्रणा न बसविणाऱ्या उद्योगांवर कारवाई करावी.

नवी मुंबई पर्यावरणीय कृती आराखडा संदर्भात झालेल्या सादरी करणाच्या अनुषंगाने, नवी मुंबई परिसरातील उद्योगांनी कोळशाचा वापराऐवजी नॅचरल गॅस चा वापर करावा. तसेच अल्प व दीर्घ कालीन उपाययोजना याची काटेकोर अंमलबजावणी करुन नवी मुंबई, टीटीसी एमआयडीसी परिसराचा सेपी

स्कोर (गुणांकन) कमीत कमी ठेवण्यासाठी खालील अल्प व दीर्घ कालीन कार्यक्रमाव्दारे प्रदूषण कमी करण्यास सहाय्य करावे. तसेच सर्व संबंधित औद्योगिक असोसिएशन, एमआयडीसी, महानगर गॅस, दगड खाण, नवी मुंबई महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी, औद्योगिक आरोग्य व सुरक्षा विभाग यांची प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नवी मुंबई यांनी दरमाह आढावा घेण्याचे निश्चित केले.

**सी.ई.पी.आय.निर्देशांक कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे**

| अ. क्र. | बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे | विभागाने करावयाची कारवाई | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमार्फत औद्योगिक वसाहतीचे क्षेत्र तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या रहिवाशी क्षेत्रात पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याचा लेखाजोखा तयार करुन औद्योगिक व घरगुती वापर असे वर्गीकरण करावे व सीईटीपीस पाठविण्यात येणारे सांडपाणी आणि सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत प्रक्रिया करण्याकरीता पाठविण्यात येणारे सांडपाणी याबाबतचा सविस्तर तपशिल सादर करणे. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १५ दिवस |
| २. | औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी वाहतूक करणाऱ्या जलवाहिन्यांमधुन होणाऱ्या गळतीस त्वरित प्रतिबंध करण्याकरीता म.औ.वि.महामंडळाने प्रस्तावित केलेला कार्यक्रम समाधानकारक व वेळेत पूर्ण करण्याकरीता SCADA सारखे उपलब्ध तत्रज्ञानाचा वापर करुन गळती रोखण्यात यावी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १५ दिवस |
| ३. | म.औ.वि.महामंडळाने भुखंडनिहाय मोकळया जागेच्या उपलब्धतेबाबतचा आढावा घ्यावा व हरित पट्टा निर्मितीसाठी उपलब्ध जागेबाबतचा अहवाल सादर करणे. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/संबंधीत उद्योग | १५ दिवस |
| ४. | सर्व वाहनांना पुरेसा सीएनजीचा पुरवठा होण्याच्यादृष्टीकोनातून मे.महानगर गॅस लि. यांनी म.औ.वि.महामंडळ परिसरात नविन स्टेशन उभारण्याकरीता लागणाऱ्या भुखंडाबाबतचा प्रस्ताव ७ | प्रादेशिक परिवहन विभाग/महानगर गॅस लि. | १५ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| | दिवसांत म.औ.वि.महामंडळाकडे सादर करावा व त्यावर म.औ.वि.महामंडळाने सत्वर निर्णय घेणे. | | |
| ५. | सांख्यिकी अहवाल, जसे – एकूण नोंदणी झालेले ऑटो रिक्षा, कार, टेम्पो, ट्रक, बस, इ. त्यापैकी सीएनजीवर चालणारे वाहने आणि १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुनची वाहने, तसेच पीयुसीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची संख्या, इ. बाबत अहवाल सादर करणे. | प्रादेशिक परिवहन विभाग | १५ दिवस. |
| ६. | टीटीसी औद्योगिक परिसरातील उर्वरित रस्त्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे. | नवी मुंबई महानगरपालिका | २ महिने |
| ७. | नवी मुंबई महानगरपालिका, म.औ.वि.महामंडळ यांनी टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे काम पूर्ण झालेल्या ठिकाणी मोकळया जागेत त्वरित वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेणे. तसेच प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी हवेची गुणवत्ता मोजमाप करणाऱ्या केंद्रांच्या परिसराची पाहणी करुन अहवाल सादर करणे. | नवी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई. | ७ दिवसांत |
| ८. | दगड खाण व खडी क्रशर मशिन असोसिएशन यांनी मागील बैठकीच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे, तसेच प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणातील खडी क्रशर मशिनच्या पाहणी अहवालाचे वर्गीकरण (COMPLETE, PARTIAL, NONE) करुन काही खडी क्रशर मशिनवर कडक कारवाई करणे. तसेच दगडखाण परवान्याबाबत सिडको प्रशासन, जिल्हाधिकारी यांना लेखी कळविणे. | दगडखाण असोसिएशन, नवी मुंबई/जिल्हाधिकारी खाणकाम विभाग / प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई | १५ दिवस |
| ९. | उद्योगनिहाय कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल सादर करणे | औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय (DISH) | १५ दिवस |
| १०. | टीटीसी औद्योगिक परिसरातील प्रथम मोठे उद्योग यांना गॅस वापराबाबतची शर्थ अनिवार्य करुन याबाबत प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी मोठया उद्योगांचा आढावा घेणे व पुढील कारवाई करणे. | महानगर गॅस लि., टीबीआयए-नवी मुंबई, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ नवी मुंबई/संबंधीत उद्योग | १५ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | टीटीसी परिसरातील स्थित उद्योगांनी हवा व जल प्रदूषण निवारणाकरीता उभारलेल्या सयंत्रणेबाबत, ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशन, संबंधित उद्योग व प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी संयुक्तपणे आढावा घ्यावा व आवश्यक त्या ठिकाणी अद्यावतीकरणाचे काम हाती घेणे. | १. नवी मुंबई टीटीसी परिसरातील संबंधीत उद्योग उद्योग<br>२. ठाणे बेलापूर इंडस्ट्रिअल असोसिएशन,नवी मुंबई,<br>३. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ. | दरमाह |
| १२. | टीटीसी परिसरात ऑनलाईन मॉनिटरिंग यंत्रणा बसविण्यासाठी निर्देशित केलेल्या सर्व उद्योगांनी त्याची पुर्तता करावी व याबाबत प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी आढावा घेऊन यंत्रणा न बसविणाऱ्या उद्योगांवर कारवाई करणे. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ नवी मुंबई व संबंधित उद्योग | ७ दिवस |

मा.सदस्य सचिव यांनी असे सूचित केले की, सर्व भागधारकांनी (Stake Holders) विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे अंमलबजावणी करावी व त्याचा अहवाल मंडळास देण्यात यावा. तसेच पुढील आढावा बैठक नोव्हेंबर-२०१५ दुसऱ्या आठवडयात पुन्हा घेण्यात येईल. बैठकीस उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सह संचालक (हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

- - - - - - - - - - - -